# तंत्रज्ञान अधिविभागात अभियांत्रिकीबाबत १४ रोजी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागात अभियांत्रिकी शाखा प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. केमिकल टेक्नॉलॉजी, फूड टेक्नॉलॉजी (दि.११), मेकॅनिकल इंजिनिअरिंग (दि.१४), कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी (दि. १५), सिव्हिल इंजिनिअरिंग (दि.१९) रोजी सकाळी ११ वाजता मार्गदर्शन शिबिर घेण्यात येणार आहेत. अभियांत्रिकी प्रवेश घेताना आवड व क्षमतेनुसार शाखेची निवड कशी करावी. अभियांत्रिकी क्षेत्रात रोजगारांच्या संधी, मूळ शाखेची निवड व त्यासाठी लागणारी पात्रता, कौशल्य याचे विद्यार्थी व पालकांना सविस्तर मार्गदर्शन मिळण्यासाठी तंत्रज्ञान अधिविभागामध्ये सर्व विद्याशाखांचे विनामूल्य मार्गदर्शन, इंडस्ट्रीमध्ये उच्चस्थानी कार्यरत असणारे अनुभवी अभियंते व तज्ज्ञ प्राध्यापकांकडून दिले जाणार आहे, अशी माहिती तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी दिली.

# विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेस प्रतिसाद

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी झालेल्या प्रवेश परीक्षेला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

गुरुवारी एकूण १८९ विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली. त्यामध्ये मास्टर ऑफ रूरल स्टडीज, एम. बी. ए., एम. एस. डब्ल्यू. आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या प्रवेश परीक्षेसाठी एकूण २४८ जणांनी पूर्वनांदणी केली हाती. त्यापैकी १८९ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून परीक्षा दिली, तर ५९ जण गैरहजर राहीले.

केआयटी कॉलेज, डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग या कॉलेजवर या परीक्षा पार पडल्या. सकाळी साडेनऊ ते सायांकळी पाच यावेळेत या परीक्षा झाल्या.

# तंत्रज्ञान अधिविभागात अभियांत्रिकी शाखाबाबत मार्गदर्शन शिबिर

## ११ ते १९ जूनदरम्यान आयोजन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

आपल्या आवडीनुसार व आपल्या क्षमतेनुसार अभियांत्रिकी शाखेची निवड कशी करावी, अधिक क्षेत्रात रोजगारांच्या संधी हव्या असल्यास मूळ शाखाची निवड व त्यासाठी लागणारी पात्रता, कौशल्य याचे सविस्तर मार्गदर्शन विद्यार्थी व पालक यांना मिळण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये सर्व विद्याशाखांचे विनामूल्य मार्गदर्शन, इंडस्ट्रीमध्ये उच्चस्थानी कार्यरत असणारे अनुभवी अभियंते व तज्ज्ञ प्राध्यापक यांच्याकडून दिले जाणार आहे. या परिसंवादाचे आयोजन विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील ऑडिटोरिअम दि. ११ ते १९ जून या कालावधीमध्ये होणार आहे.

बदलती जीवनशैली जागतिकीकरण आणि उच्च शिक्षण तंत्रज्ञानामुळे आज



विविध क्षेत्रात अभियंता म्हणून करिअर करण्याची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाली आहे. सर्वात जास्त उत्पन्न मिळवण्याचे क्षेत्र म्हणून अभियांत्रिकी क्षेत्राची ओळख आहे. १० वी १२ वी नंतर कोणत्याही क्षेत्रातील अभियांत्रिकी शिक्षणासाठी प्रवेश घेऊ शकता. अभियांत्रिकी शिक्षणाविषयी वाटणारे आकर्षण आपल्याकडे आजही कायम आहे. अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या जागादेखील वाढताना दिसत आहेत. अशावेळी स्वाभाविकच इंजिनिअरिंग म्हणजे काय? किती विद्याशाखांतून हे शिक्षण घेता येते? असे प्रश्न विद्यार्थ्यांना व पालकांना पडतात. इंजिनिअरिंगला जाऊ इच्छिणाऱ्या बहुतांश विद्यार्थ्यांमध्ये विविध विद्याशाखांबद्दल अनभिज्ञता असते. नेमकी कोणती विद्याशाखा निवडायची त्या शाखेतून पुढे नोकरीच्या नेमक्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

या कार्यक्रमामध्ये अभियांत्रिकीच्या विविध शाखा, अचूक निवड, विविध शाखांमधील पर्याय, प्रवेश प्रक्रिया यांसारख्या विषयावर मार्गदर्शन, त्याचबरोबर अभियांत्रिकीनंतरच्या करिअर संधी, व्यवसाय मार्गदर्शन, महाविद्यालयाची व विद्याशाखेची निवड, शाखांमधील प्लेसमेंट आदी विषयांच्या सर्व शंकाचे निरसन या चर्चासत्रामधून होणार आहे. उपलब्ध संधी व विद्यार्थ्यांचा कल यांचा विचार करून करिअरविषयी निर्णय घेण योग्य ठरत असल्याने या चर्चासत्राचा विद्यार्थी व पालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे करण्यात आले आहे.

## शाखानिहाय तज्ज्ञ मार्गदर्शन (कार्यक्रम, तारीख व वेळ, मार्गदर्शक)

**■ केमिकल टेक्नॉलॉजी**

११ जून २०१९, सकाळी ११.००

**मार्गदर्शक** - १ सुमेर तारे, एजीएम प्रोडक्शन, विनाती ऑरगॅनिक्स लिमिटेड, चिपळूण.

२ राजीव जांभेकर, एजीएम एच. आर, विनाती ऑरगॅनिक्स लिमिटेड, चिपळूण.

३ सचिन जे. पाटील, शिवम मेंबरेन्स, इचलकरंजी.

**■ फूड टेक्नॉलॉजी**

११ जून २०१९, सकाळी ११.००

१ कुलदीप नागलाकर, जनरल मॅनेजर, माल्टेड फूड डिव्हिजन वारणा सहकारी दूध उत्पादक संघ लिमिटेड वारणानगर.

२ पूजा नारकर, उद्योग आधार कन्सल्टन्सी मुंबई.

**■ मेकॅनिकल इंजिनिअरिंग**

१४ जून २०१९, सकाळी ११.००

१ डॉ. जयदीप बागी, संचालक तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ

२ संगमेष कालसन्नवार. सीनिअर मॅनेजर प्रोजेक्ट्स इन्डो स्कॉटलं ऑटो पार्टस प्रायव्हेट लि. पुणे

**■ कॉम्प्युटर सायन्स अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजी आणि इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी**

१५ जून २०१९, सकाळी ११

१ गणेश आनेकर, प्रिन्सीपॉल इंजिनीअरिंग मिक्रोसॉफ्ट पुणे.

२ तेजस मगदूम, रिसर्च इंजिनिअर, हुंडाई मोबीस आर अ‍ॅन्ड डी सेन्टर, हैद्राबाद.

**■ सिव्हिल इंजिनिअरिंग**

१९ जुन २०१९, सकाळी ११

१ मिलिंद कुलकर्णी, एक्झिकेटीव्ह इंजिनिअर, पीएमजीएसवाय, कोल्हापूर.

२ शिवप्रसाद बारटक्के, डेप्युटी इंजिनिअर, एमजेपी, कोल्हापूर.